# सार्वजनिक बांधकाम विभाग

## १. सीआर/१४७/ठाणे/१४

फिर्यादी यांचे अंतरा रेस्टॉरंट नावचे हॉटेल, कर्जत, जिल्हा ठाणे येथे आहे. सदर हॉटेलचा जाहीरातीचा बोर्ड राज्य महामार्गावर लावण्या करीता आरोपी लोकसेवक गिरीशकुमार चंद्रकांत पारीक, उप अभियंता, वर्ग–२, सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत, जि. रायगड यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला होता. आरोपी लोकसेवक यांनी दिनांक २५/०२/२०१४ रोजी बोर्ड–जाहीरात लावण्याची परवानगी देण्याकरीता रु.२५ हजार लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.२० हजार स्वीकारण्याचे मान्य केले व त्यांच्या कार्यालयात पैसे स्वीकारले. सदरबाबत कर्जत पो.स्टे. गु. र.नं. २/२०१४, ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

आलोसे यांना सापळा कारवाईत पकडल्यानंतर त्यांचे कब्जात व ठाणे/नाशिक येथील घर, दुकान व गाळे, बॅक लॉकर्सची तपासणी केली असता रु.९,१३,३७,४०३/– किंमतीची स्थावर व जंगम मालमत्ता मिळून आल्याबाबत त्यांचेविरुध्द उघड चौकशी करुन अपसंपदा संपादित केल्या प्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## २. सीआर/२०/सातारा/१४

फिर्यादी हे माचीपेठ, सातारा येथील रहिवाशी असून सातारा येथील खडकेश्वर मजूर सहकारी संस्थेचे सभासद आहेत. सदरची संस्था सरकारी इमारतींचे देखभाल करण्याचे कंत्राट घेते. राजभवन महाबळेश्वर येथील रंगकामाचे कंत्राट फिर्यादी यांचे संस्थेस मिळाले होते. ती कामे पूर्ण केल्याचा रिपोर्ट व कामाची बिले काढण्याचे काम आरोपी लोकसेवक रामदास जगन्नाथ पारग सहायक अभियंता, वर्ग–२ सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे राजभवन उप शाखा महाबळेश्वर यांचेकडे होते. कामे पूर्ण केल्याचा रिपोर्ट व कामाची बिले काढण्याकरीता आलोसे यांनी टक्केवारी दयावी लागेल अशी फिर्यादी यांना समज देवून या कामाकरीता दिनांक ०७/०१/२०१४ रोजी रु.१,६०,०००/– ची मागणी करुन रु.१,३५,०००/– रक्कम स्वीकारली. सदरबाबत महाबळेश्वर पोलीस ठाणे, जि.सातारा, भाग–६, गु.र.नं.२/२०१४, कलम ७, १३(१)(ड) सह १३(२)लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.